| | |
|---|---|
| MHLA120001792026 | **निशाणी क्रमांक ०९ वरील आदेश** |

अर्ज व अभिलेख पाहिला. प्रस्तुतचा अर्ज वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. मयत नागनाथ भाऊराव बिराजदार हे दि.११/११/२०२५ रोजी मयत झाले असुन त्यांच्या पश्चात त्यांचे कायदेशीर वारास अर्जदार क्र.१ ते ७ हे आहेत, परंतु अर्जदार क्र.७ शिला राम पारानुरे ही मयत असुन तिचे वारस सदर अर्जामध्ये नमुद करण्यात आलेले आहे. परंतु सदर अर्जातील अर्जदार क्र.७/१ हा मयत शिला राम पारानुरे यांचे पती असुन ते कायद्याने पत्नीचे वारस होऊ शकत नाहीत. परंतु अनावधानाने त्यांचे नाव सदर अर्जामध्ये नमुद करण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जदार क्र.७/१ राम गंगाधर पारानुरे यांचे नाव सदर अर्जामधून कमी करण्याची परवानगी मागत आहेत. अर्जदाराने त्यांच्या अर्जाच्या पृष्ठयर्थ नि.क्र.१० कडे अर्जदाराचे शपथपत्र दाखल केलेले आहे. अर्जाचे स्वरुप व आवश्यक ती दुरुस्ती पाहता असे दिसुन येते की, **अर्जदार क्र.७/१ राम गंगाधर पारानुरे** यांचे नाव कमी करण्यात यावे अशी दुरुस्ती करणे अंतिम न्यायनिर्णयाकरीता उचित वाटते. सबब अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे मत नोंदवून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

| | |
|---|---|
| ०२. | अर्जदाराने १४ दिवसांच्या आत सदर दुरूस्ती करणेची आहे व दुरूस्ती प्रत दाखल करणेचे आहे. |

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.07.24 17:20:28 +0530

निलंगा
दि. २४/०७/२०२६

( श्रीमती. के. पी. गाडे )
२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर
निलंगा, जि.लातूर